

"धनगर हे नक्की कोण? हे सामाजिक व
मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून समजून
घेणे आवश्यक आहे. कोणत्याही जातीची
गरिबी हा त्यांच्या आदिवासी होण्याचा
निकष असू शकत नाही."

Aboriginal Voices Maharashtra

धनगर आरक्षण व वास्तव



ध

नगर समाज आज **आदिवासी आरक्षण** मिळावे म्हणून रस्त्यावर उतरून **आंदोलन** करत आहे.

त्याला विरोध करण्यासाठी आदिवासी समाजाकडून देखील विविध ठिकाणी **मोर्चे** काढले जात आहेत. यावर चर्चा करण्याअगोदर केंद्र व महाराष्ट्र सरकार यांच्या या अगोदरच्या निर्णयावर विचार करणे आवश्यक आहे. **महाराष्ट्र राज्य शासनाने १२ जून १९७९** ला धनगर समाजाचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविला होता. यावर सबंधित विभागाने सखोल चर्चाही केली होती. पण **धनगर हा समाज आदिवासींचे निकष पूर्ण करू न शकल्याने** हा प्रस्ताव केंद्र सरकारने नाकारला आणि अखेर महाराष्ट्र शासनाने **१९८१** मध्ये आपला प्रस्ताव मागे घेतला. सदर बाब धनगर समाजाचे नेते त्यांच्याच समाजाला न सांगता भावनिकतेचा गैरफायदा घेत आरक्षण आपणास मिळेलच असा खोटा विश्वास निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजत आहेत. **आदिवासींचे निकष कोणते आहेत** व **भटक्या जमातीची गुणवैशिष्ट्ये काय आहेत** हे आपण समजून घेतले तर हा फरक सहजपणे आपल्याही लक्षात येईल. **'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'** या पुस्तकात **डॉ.गोविंद गारे** यांनी आदिवासी कोणाला म्हणावे याबाबत विवेचन केलेले आहे. त्यात आदिवासींच्या अनेक व्याख्या दिलेल्या आहेत. त्यातील एक व्याख्या अवलोकनासाठी देत आहे.



इ. स. 1962 साली शिलॉगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने **आदिवासींची व्याख्या** पुढीलप्रमाणे केलेली आहे,

"एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधांवर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज असे म्हणतात."

विविध **मानववंशशास्त्रज्ञांनी** केलेल्या व्याख्यांवरून आदिवासी समाजाची पुढील **लक्षणे** सांगितलेली आहेत.

१) विशिष्ट भूप्रदेश
२) प्रमाण लघुता (थोड्या लोकांचा समूह)
३) एकाच रक्तसंबंधावर आधारित
४) स्वताची बोलीभाषा व लेखनकलेचा अभाव
५) स्वतःची वेगळी जीवनपद्धती
६) साधी अर्थव्यवस्था
७) सीमित तंत्रविद्या
८) समान धर्म (निसर्ग पूजक)
९) सामाजिक एकजिनसीपणा
१०) मातृसत्ताक

धनगर समाज हा भटक्या विमुक्त गटात समाविष्ट केलेला असल्याने भटक्यांच्या उत्पत्तीविषयी माहिती करून घेणे आवश्यक आहे. 'भटके' (Nomadics) या शब्दाची उत्पत्ती 'नेमो' (Nemo) या ग्रीक शब्दापासून झालेली आहे. याचा अर्थ 'चारणे' असा आहे. विविध जनावरांना घेऊन जेथे चारा उपलब्ध होईल तेथे नेण्याच्या

प्रवृत्तीतून एक समाज तयार झाला. या निमित्ताने हिंडणारा व पुढे आपल्या उपजीविकेसाठी भटकणारा तो भटका (Nomadic) समाज बनला.



भारतीय समाजविज्ञानकोश, खंड-4 मध्ये **गर्गे एस. एम.** यांनी **भटक्यांचे** केलेले वर्णन आपल्या अवलोकनासाठी देत आहे...

"कोणत्याही एके ठिकाणी स्थायी स्वरुपाची वस्ती न करता उपजीविकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणा-या जमाती म्हणजे भटक्या जमाती. अनादी काळापासून टोळी जीवनाने राहणारा मानव अस्थिर होता. उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्याने त्याला कायम फिरावे लागे. आपले जीवन निश्चित करणे शक्य झाले नाही ते भटकतच राहिले. या लोकांना आजही कायमस्वरूपी चरितार्थाची साधने उपलब्ध नाहीत. परिणामी त्यांचे जीवन मागासलेले, अस्थिर व दुर्लक्षित झाले आहे. भटकणे हाच स्थायीभाव आहे. काही भटक्या जमातींना कुठेही घर नसते, कोणतेही गाव नसते. सदैव या गावाहून त्या गावास उपजीविकेसाठी त्यांना सहकुटुंब भटकावे लागते. तर काही भटक्या जमाती स्थायी जीवन जगतात. वर्षातून काही महिने व्यवसायाच्या स्वरूपामुळे पोट भरण्यासाठी त्यांना भटकावे लागते."



धनगर या शब्दाची उत्पत्ती :

The Dange Dhangar of Kolhapur District : A Sociological Study या 1987 साली प्रकाशित झालेल्या **पी. बी.द्राक्षे** यांच्या पुस्तकात ‘धनगर’ शब्दाच्या उत्पत्तीबाबत पुढील बर्णन आलेले आहे,

“धनगर या शब्दाच्या उत्पत्तीबाबत सामान्यत: धनगर या शब्दाचा अर्थ ‘धन’ म्हणजे संपत्ती (गुरे आणि मेंढ्यांच्या स्वरूपात) आणि ‘गर’ याचा अर्थ पाळणारा म्हणजेच जे लोक मेंढ्या किंवा गुरे पाळतात आणि त्यांची विक्री करतात, त्यांना धनगर म्हणून ओळखले जाते.” (पान क्र. 30)

वरील व्याख्या, वर्णन व धनगर शब्दाची उत्पत्ती या बाबी बारकाईने समजून घेतल्या तर आदिवासी जमाती व धनगर समाज यातील असणारा मौलिक फरक स्पष्ट दिसून येतो.. धनगर समाजावर स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात अनेक समाजशास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण लेखन केलेले आहे. त्यातील मांडणी समजून घेतली तर धनगर समाज हा नक्की कोण आहे हे सामान्य व्यक्तीला देखील ठरवता येईल. अर्थात याची जाणीव राज्यातील सर्वच राजकीय नेत्यांना आहे. परंतु आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी ते धनगर समाजाच्या अस्मितेला हात घालून समाजाला चुकीच्या दिशेने घेऊन जाऊन महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण खराब करत आहेत. धनगर हे आदिवासी आहेत कि नाही याबाबत न्यायालयीन लढाई सुरु आहे. असे असतानाही राजकीय दबाव तंत्राचा वापर करून चुकीची मागणी उभी करून सरकारी यंत्रणेला वेठीस धरण्याचे काम धनगर समाज करत आहे.



भारतीय संविधानाने प्रत्येकाला आपल्या मागण्या सरकार दरबारी मांडण्याचा संविधानिक अधिकार दिलेला आहे. त्यानुसार योग्य व न्याय्य मागणी धनगर समाजाने केली असती, तर कदाचित समस्त आदिवासी समाजाने त्यांच्या मागणीला पाठींबा दिला असता. परंतु धनगर समाज आदिवासी आरक्षण, आदिवासी बजेट, आदिवासींचे राखीव मतदारसंघ, अ‍ॅट्रॉसिटी कायदा यांच्यावर डोळा ठेऊन मागणी करत असल्याने आदिवासी समाज बांधव त्यांच्या मागणीला विरोध करत आहेत. धनगरांना त्यांच्या विकासासाठी काय पाहिजे ते द्या, पण आदिवासी आणि धनगर हि तुलना करणे पूर्णपणे चूक असल्याचे मत आदिवासी समाज बांधव करत आहेत.



धनगर समाजाकडून केल्या जात असणाऱ्या मागणीतील सर्वात पहिली मागणी हि आहे कि अनुसूचित जमातीच्या यादीत धनगर यांचा समावेश केलेला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याने आमच्यावर अन्याय होत आलेला आहे. या मागणीचा संविधानिक विचार केला किंवा पुरेशा पुराव्यांचा अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल कि अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर आणि धनगड हे दोन्हीही शब्द नाहीत. मूळ इंग्रजी आदेशात ‘Dhangad’ असा शब्द प्रयोग असलेल्या जमातीचा उच्चार वास्तविक ‘धांगड’ असा आहे. परंतु हे वास्तव जाणीवपूर्वक लपवून राज्यातील धनगर समाजाचे नेते ‘ड’ आणि ‘र’ या शब्दांचा खेळ करून आम्ही आदिवासी आहोत असे सिद्ध करू पाहत आहेत. मराठीतील ‘र’ हा हिंदीत लिहिताना ‘ड’ असा लिहिला जातो असा त्यांचा युक्तिवाद आहे. परंतु अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश १९५० मधील यादी हि हिंदीत नसून इंग्रजीत असल्याचे वास्तव ते जाणीवपूर्वक लपवतात. जर त्यांचा हा युक्तिवाद शास्त्रीयदृष्ट्या खरा आहे असे मान्य केले, तर मग ‘अहमदनगर’ हा शब्द इंग्रजीत लिहिताना ‘Ahmednagad’ व ‘नागपूर’ हा शब्द इंग्रजीत लिहिताना

‘Nagpud’असे लिहिले जाणे आवश्यक होते. पण तसे लिहिल्याचे आपणास दिसून येत नाही. उलटपक्षी हिंदीतील ‘कुडूख’ हा शब्द इंग्रजीत ‘Kurukh’, मराठीतील ‘नांदेड’ हा शब्द इंग्रजीत ‘Nander’ व ‘बीड’ हा शब्द इंग्रजीत ‘Bir’ असा लिहिल्याचे जुन्या कागदपत्रांत दिसून येते (संदर्भ : Statistical Abstract of H.E.H. the Nizam’s Dominions from 1331 to 1340 Fasli, लेखक : Mazhar Husain, प्रकाशक : Government Central Press, प्रकाशन वर्ष : १९३८).

Second Issue.

H.E.H. the Nizam's Government

STATISTICAL ABSTRACT
of
H.E.H. the Nizam's Dominions
from
1331 to 1340 Fasli
(1922 to 1931 A.D.)
by
MAZHAR HUSAIN, M.A., B.Sc.,
Director of Statistics

Hyderabad-Deccan
Government Central Press
1938

Price Rs. 5-8-0.]

94

No.—44. PROPERTY STOLEN AND RECOVERED 1340 F.

City & Districts	No. of cases in which property was stolen	No. of cases in which property was recovered	Percentage of cases in which property was recovered to cases which property was stolen	Amount of property stolen	Amount of property recovered	Percentage of value of property recovered to value of property stolen
1	2	3	4	5	6	7
				Rs.	Rs.	
Hyderabad. i. Hyd. City.	518	318	61.38	1,34,866	58,781	43.59
Hyderabad. ii. Br. Administrated area ..	..	..	..	47,359	10,056	21.23
2. Atraf-i-Balda	189	71	37.56	19,278	4,080	21.16
3. Warangal ..	286	121	42.23	34,090	8,254	24.21
4. Karimnagar ..	220	114	51.81	18,079	11,642	64.39
5. Adilabad ..	220	105	47.72	33,947	12,369	36.43
6. Nizamabad ..	167	66	39.52	19,569	5,618	28.78
7. Medak ..	139	89	64.03	19,743	4,992	25.07
8. Mahbubnagar	199	101	50.74	36,291	11,747	32.39
9. Nalgonda ..	180	112	62.22	10,655	6,574	61.69
10. Aurangabad ..	260	146	66.15	33,263	11,559	34.75
11. Bir ..	115	67	59.13	27,187	15,293	57.22
12. Nander ..	242	111	45.90	52,946	20,696	39.18
13. Parbhani ..	237	140	59.07	23,610	9,103	38.55
14. Gulbarga ..	323	162	50.15	42,871	13,642	31.82
15. Osmanabad ..	161	88	54.64	20,708	3,494	16.87
16. Raichur ..	93	60	64.52	16,685	7,490	44.88
17. Bidar ..	182	110	60.43	27,955	17,399	62.23
Total for 1340 F...	3,731	1,981	53.09	6,19,102	2,32,789	37.61
,, 1339 F.	3,394	1,946	57.33	4,58,291	1,72,271	37.54
,, 1338 F.	3,186	1,789	56.15	5,09,948	2,07,256	40.64
,, 1337 F.	2,864	1,625	56.78	4,90,033	1,94,511	39.69
,, 1336 F.	3,122	1,790	57.33	4,39,943	2,17,006	49.55
,, 1335 F.	2,844	1,534	53.93	4,39,416	1,44,082	32.78
,, 1334 F.	2,864	1,780	62.16	5,35,262	2,11,164	39.45
,, 1333 F.	3,445	2,213	64.20	5,74,852	2,36,879	41.25
,, 1332 F.	3,789	2,057	54.28	7,42,871	4,02,522	54.16
,, 1331 F.	4,225	2,661	62.98	6,03,609	2,41,677	40.38

धनगर हा शब्द विविध भाषांमध्ये कसा लिहिला जातो याबाबत **Shepherds of India** या सन 1978 साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात **शशी एस.एस.** यांनी एका तक्त्याद्वारे स्पष्ट केलेले आहे.

Appendix III : Names in Language

The shepherds are known as under in Indian languages and dialects

Sr.No	Language	Name
1	Hindi	Pal Kshatriya, Dhangar, Baghel, Pal Gadariya
2	Punjabi	As Above
3	Urdu	As Above
4	Kashmiri	Pohol
5	Sindhi	Redharu
6	Marathi	Dhangar
7	Gujrati	Rabari and Bharwad
8	Bengali	Rakhal (Rakhalu)
9	Assamese	Bherarokhiya
10	Oriya	Meshpalak
11	Telugu	Golla
12	Tamil	Attutidiyan
13	Malayalm	Attiyan
14	Kannada	Kurba, Kurub, Kuraba
15	Sanskrit	Ajpal, Chagal
16	Oraon, Kurk	Dhangar

वरील विवेचन व संदर्भ समजून घेतले असता धनगर समाजाचे नेते ‘र’ चा ‘ड’ झाला असा जो जावई शोध लावत आहे, तो पूर्णपणे चुकीचा असून उलट मराठीतील ‘ड’ इंग्रजीत लिहिताना ‘र’ असा लिहिला जात असल्याचे साधे भाषा ज्ञान त्यांना नसल्याचे दिसून येत आहे.ओरिसा राज्यात ओरान समाजाची उपजमात असलेल्या आदिवासी जमातीचे इंग्रजी स्पेलिंग ‘Dhangar’ असे लिहिले जात असले तरी, त्याचा उच्चार व त्या

जमातीची वैशिष्टे हि महाराष्ट्रातील ‘धनगर’ समाजाशी कुठेही जुळत नाहीत याबाबत अनेक पुस्तकांतून, साहित्यातून व अहवालांतून खुलासा झालेला आहे. उलटपक्षी उत्तरप्रदेशात धनगर हि जात अनुसूचित जातीच्या यादीत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने देखील सिद्ध केलेले आहे. त्यामुळे धनगर समाजाकडून केला जाणारा स्पेलिंगच्या चुकीचा दावा हा पूर्णपणे खोटा असून आदिवासींचे कधीही भरून न येणारे नुकसान करणारा आहे. मुळात आदिवासींचा धनगर समाजाच्या आरक्षणाला कुठेही विरोध नाही. विरोध आहे तो त्यांना आदिवासी हि ओळख देण्याला. त्यामुळे धनगर समाजावर अन्याय झाला असा कांगावा करून व आपल्या राजकीय दबाव तंत्राचा वापर करून सामाजिक वातावरण खराब करण्याचे काम त्यांच्याकडून केले जात आहे यावर सरकारने वेळीच नियंत्रण आणणे आवश्यक आहे.

सन **1950** चा अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती आदेश हा **राज्यपालांच्या** सल्लामसलतीने आणि **राष्ट्रपतींकडे** उपलब्ध असलेल्या प्रत्येक जाती जमातीच्या संदर्भातील **अहवाल** व **तपशिलांच्या** आधारे प्रसारित करण्यात आला होता. नंतरच्या काळात या आदेशात संसदेने विविध अहवाल व उपलब्ध पुरावे यांचा आधार घेऊन बदलही केलेले आहेत. परंतु **‘धनगड’** ऐवजी **‘धनगर’** हा बदल करण्यास त्यांनी स्पष्ट **नकार** दिलेला आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आदेश (दुसरी दुरुस्ती) विधेयक 2002 संदर्भात कामगार आणि कल्याणविषयक **स्थायी समितीच्या 27 व्या अहवालाचा संदर्भ** समजून घेणे सर्वानांच उपयुक्त ठरेल. हा मुद्दा महाराष्ट्रातील ‘धनगड’ आणि ‘धनगर’चा होता. **‘धनगड’** जमातीचा महाराष्ट्रातील जमात सूची **36** नुसार **अनुसूचित जमाती** म्हणून समावेश करण्यात आला आहे. सदर ठिकाणी **स्पेलिंगची चूक** झालेली असून तेथे **‘धनगड’** हि अनुसूचित जमात वास्तविक **‘धनगर’** आहे, असे एका खासदाराने जोरदारपणे मांडले होते. मंत्रालयाने यावर सविस्तर चर्चा केली. अनेक पुरावे तपासल्यानंतर मंत्रालयाने हि चूक दुरुस्त करण्यास नकार दिला. मंत्रालयाने हे देखील स्पष्ट केले कि समान नामकरण असलेले दोन भिन्न समुदाय महाराष्ट्रात आहेत. पहिला समुदाय म्हणजे **‘धांगड’** (Dhangad), जो ओरावचा उपसमूह आहे, ज्याची नोंद अनुसूचित जमाती क्रमांक 36 वर आढळते. त्यांचा **पारंपारिक व्यवसाय शेती** आहे. दुसरा समुदाय म्हणजे **‘धनगर’** (Dhangar) होय. यांचा **पारंपारिक व्यवसाय गुरेढोरे पाळणे** आणि **लोकर विणणे** आहे. उपरोक्त अहवालातील परिच्छेद क्रमांक **2.17** आणि **2.18** देखील आपण समजून घेणे आवश्यक आहे.

2.17 - The ‘Dhangad’ community has been included in the Constitution (Scheduled Tribes) Orders, 1950 vide entry No.36 in part IX of Maharashtra State. Shri Pradeep Rawat, MP has pointed out that there is spelling mistake in the community. He stated that instead of ‘Dhangad’ the correct name of this Scheduled Tribe community is ‘Dhangar’. He has, therefore, requested that the Community may take necessary action to correct the printing mistake.

2.18 - The Ministry in their reply has stated that in the State of Maharashtra there are two distinct communities having similar nomenclature, one is Dhangad which is a sub group of Oraon, a Scheduled Tribe appearing at S.No.36 of the List of Scheduled Tribes. The traditional occupation of this community is cultivation.There is another community known as 'Dhangar' whose traditional occupation is cattle rearing and weaving of woolens. The 'Dhangad' and the 'Dhangar' are two distinct communities having no ethnic affinity at all. The Dhangars who are shepherds have been notified as Nomadic Tribe in the State of Maharashtra. Therefore, there is no printing mistake in the Scheduled Castes and Scheduled Tribes (Amendment) Act, 1976 through which the Constitution (Scheduled Tribes) Order, 1950 was amended.

महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या मागणीचा विचार करत असताना आजच्या राजकीय नेतृत्वाने व समाजाने **सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाच्या निकाला**ची देखील नोंद घेणे आवश्यक आहे. ***महाराष्ट्र सरकार विरुद्ध मिलिंद आणि इतर* (A.I.R. 2001 SC 393)** यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले कि ***अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ह्या १९५० च्या आदेशाप्रमाणे वाचल्या पाहिजेत. एखाद्या जमातीची ती उपजामात आहे किंवा तिचा भाग आहे असे म्हणण्याची देखील अनुमती नाही. कोणत्याही जातीचा समूह हा अनुसूचित जमाती आदेशामध्ये नमूद केलेल्या आदिवासी समुदायाचा समानार्थी आहे असे म्हणण्याची देखील अनुमती नाही.***

<u>या निकालाच्या अनुच्छेद 35 मध्ये खालील गोष्टी नमूद केलेल्या आहेत :</u>

१) अनुसूचित जमाती आदेश 1950 मध्ये जर एखादी जात, समूह, गट, नाव यांचा स्पष्ट उल्लेख केलेला नसेल तर त्याबाबत चौकशी करणे किंवा त्याचे आदिवासी असल्याचे पुरावे सादर करणे यास परवानगी नाही.

२) अनुसूचित जमाती आदेश 1950 हा जसा आहे तसाच वाचला पाहिजे. अनुसूचित जमाती आदेशात नमूद न केलेल्या जाती, उपजाती, एखाद्या एखाद्या जातीचा भाग किंवा समूह हा अनुसूचित जमाती आदेशातील एखाद्या जमातीशी नामसाधर्म्य दाखवतोय असे म्हणण्याची अनुमती नाही.

३) अनुच्छेद 342 च्या खंड (1) अन्वये अनुसूचित जमातीमध्ये एखाद्या जातीचा समावेश करण्याचा किंवा त्यातून काढण्याचा अधिकार हा फक्त संसदेला आहे. हा बदल फक्त संसदेतील कायद्याने केला जाऊ शकतो. इतर कोणालाही त्याचा अधिकार नाही.

४) अनुच्छेद 342 च्या खंड (1) अंतर्गत प्रसारित करण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये सुधारणा किंवा बदल करण्याचा अधिकार राज्यसरकार किंवा न्यायालय किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणास नाही.

धनगर समाज हा पशुपालक व भटका समाज असून त्याचा उल्लेख जात म्हणून अनेक ठिकाणी आपणास दिसून येतो. आदिवासी हा निसर्गपूजक असून धनगर समाजाच्या पशुपालक व्यवसायापासून पूर्णतः वेगळा आहे. धनगर नक्की कोण ? हे पडताळून पाहायचे असेल तर खालील लिखित साहित्यातील संदर्भ पडताळून पाहणे अगत्याचे आहे......

१) पुस्तक : Tribes and Castes of Indian Central Provinces of India

लेखक : R.V.Russel

प्रकाशन वर्ष : 1916

"The shepherd castes who tend sheep and goats (the Gadarias, Dhangars, and Kuramwars) also falls into this group." (पान क्र. 64)

"धनगरांचा पारंपारिक व्यवसाय शेळ्या मेंढ्या पाळणे हा आहे आणि ते शेळ्यांचे दुध विकतात, मेंढ्यांच्या लोकरीपासून घोंगडी बनवतात. ते सामान्यत: मेंढ्या चरण्यासाठी पडीक असलेल्या जमिनीच्या जवळ राहतात." (पान क्र. 480-481)

सन १९१६ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकाचा उद्देश हा भारतातील जाती -जमातींची यथोचित माहिती प्रसारीत करणे असा होता. त्यामुळे या पुस्तकात धनगरांच्या पारंपरिक व्यवसायाचे केलेले वर्णन हे वास्तव दर्शविणारे आहे. शेळ्या मेंढया पाळणे हा धनगरांचा व्यवसाय होता हे लेखकाचे प्रत्यक्ष निरीक्षण आहे. यावरून धनगर हे पशुपालक असल्याची बाब स्पष्ट होते. पशुपालक जातींना त्या काळात किंवा त्या पूर्वीच्या काळात सतत भटकंती करावी लागत होती. यावरून त्यांचा भटक्या विमुक्तांच्या गटात केलेला समावेश हा योग्यच आहे असे सिद्ध होते.

२) Census of India 1901 या पुस्तकात जातीच्या स्तंभात धनगर जातीचा उल्लेख केलेला असून नांदेड, शिरपूर, परभणी येथील नोंदी केलेल्या आहेत.

३) Census of India 1891 मध्ये ***Dhangar*** अशाच स्पेलिंगचा उल्लेख आहे. त्यामुळे 'र' चा 'ड' झाला हा महाराष्ट्रातील धनगरांकडून केला जात असलेला दावा अत्यंत चुकीचा असल्याचे सिद्ध होते.

कोणत्याही प्रकारे पुराव्यानिशी संशोधन केल्यास धनगर हे आदिवासी आहेत हे सिद्ध होऊ शकत नाही हे धनगरांना चांगलेच माहीत असल्याने त्यांनी आदिवासी होण्यासाठी हा जावई शोध लावलेला आहे.

४) पुस्तक : Census of India 1931 (Bombay Presidency), Vol VIII, Part II
लेखक : A.H.Dharup

सदर पुस्तकात धनगरांच्या पारंपारिक व्यवसायाचा उल्लेख ***Shepherds and wool weavers*** असा केलेला आहे.

५) पुस्तक : Castes and Tribes of Southern India
लेखक : Thurston, Edgar, Rangchari
प्रकाशक : Government Press, Madras
प्रकाशन वर्ष : 1909

"Dhangar – Dhangar or Donigar, is recorded, in the Madras census report, 1901, as a Marathi caste of shepherds and cattle breeders. I gather, from a note on the Dhangars of the Kanara district in the Bombay Presidency, that the word Dhangar is generally derived from the Sanskrit dhenu, a cow. Their home speech is Marathi, but they can speak Kanarese. They keep a special breed of cows and buffaloes, known as dhangar mhasis and dhangar gais which are the largest cattle in Kanara. Many of Shivajis infantry were Satara Dhangars." (पान क्र. 167)

वरील मजकुरात विशेषत : मराठी म्हणजेच महाराष्ट्रातील धनगरांचा उल्लेख करताना 'जात' (Caste) हा शब्दप्रयोग लेखकाने वापरलेला आहे. तसेच त्यांचा व्यवसायाचा देखील उल्लेख केलेला आहे. 'धनगर' हा शब्द संस्कृतमधील 'धेनु' या शब्दापासून तयार झालेला असून धेनु म्हणजे गाय असे वर्णन केलेले आहे. यावरून धनगर हे पशुपालक असल्याचे सिद्ध होते.

६) Census of 1891 (Imperial Tables) Imperial Series – Vol-X
या पुस्तकात पान क्र.232, 524, 530, 534 वर जातीमध्ये ***धनगर*** समाजाचा उल्लेख केलेला आहे.

७) Caste and Land Relations In India A study of Maharashtra या S.M.Mandhare यांच्या 1989 मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात पान क्रमांक 107 वर Agricultural Castes या तक्त्यामध्ये *पाटील, मराठा, हटकर, वंजारी, लिंगायत, परदेशी, गोसावी* या जातींबरोबर *धनगरांचा* जात म्हणून उल्लेख आहे. त्याच पानावर **Tribes (Scheduled Tribes)** या तक्त्यामध्ये धनगरांचा उल्लेख नाही.

८) **Gaon Conflict and Cohesion In An Indian Village** या **Henry Orenstein** यांच्या 1965 साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात पान क्रमांक 26 वर *माळी, धनगर, भोई, वडारी* या जातींचा उल्लेख असून धनगरांचा मुख्य व्यवसाय ***Shepherd*** असा दर्शविण्यात आलेला आहे.

९) The Last Wanderers : Nomads and Gypsies of India या T.S. Randhawa यांच्या पुस्तकात पान क्रमांक 59 वर विविध व्यवसाय करणाऱ्या जातींचा उल्लेख आहे. यात **Shepherd** हा व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये *गडरिया, धनगर, कुरुमवार* या जातींचा उल्लेख आहे.

याच पुस्तकात पान क्रमांक 62 वर "The Dhangar (a Maratha caste of Shepherds) constituated an important contingent of Shivaji's guerilla soldiery" असा पशुपालन करणारी *मराठा जात* म्हणून **धनगरांचा** उल्लेख करण्यात आलेला आहे.

पान क्रमांक 96 वर *"The three main shepherd castes all have have functional names, that of the Dhangar or Maratha shepherds being probably derived from dhan, wealth, meaning their flocks of sheep and goats, while the Kurumwar or Telugu shepherds take their name, like the Gadaria, from the word for sheep, kuruba"* यातही **धनगर** किंवा **मराठा पशुपालक** असा उल्लेख करून लेखकाने ***धनगर जात मराठा*** समाजाशी निगडीत असल्याचे दर्शविले आहे.

त्याच पुस्तकात आलेला मजकूर ***"Dhangar the Maratha group of shepherds sell goats milk, make blankets from sheep's wools and at times, use their shepherd dogs for hunting hare. They are Hindus"*** *धनगर* हे *मराठा* समाजातील एक गट असल्याचे स्पष्ट करतात.

१०) Ethnography (Castes and Tribes) या Sir Athelstane Baines यांच्या 1912 साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात पान क्रमांक 103 वर आलेला मजकूर हा महाराष्ट्रातील धनगर आणि इतर राज्यातील धनगर नाव असलेला समाज यांच्यात फरक असल्याचे स्पष्ट करतो. महाराष्ट्रातील धनगर हे कुणबी असल्याचे व मराठी भाषा बोलणारा समूह म्हणून उल्लेख केलेला आहे.

"The Dhangars are now, however, a Marathi speaking community, hardly to be distinguished from their kunbi neighbours. The Holkar chief of Indore belongs to this caste, and still enjoys hereditary grazing rights in parts of the Dekkan and some of the best of Shivaji's celebrated 'Mavali' troops were Dhangar"

११) Celebrating of Life : Indian Folk Dances या Jiwan Pani यांच्या पुस्तकात पान क्रमांक ३२ वर आलेला मजकूर "Dhangar is a shepherd community who migrated long ago from the Saurashtra region" धनगर हे पशुपालक असून ते भटके असल्याच्या मुद्द्यावर प्रकाश टाकतो.

याच पुस्तकात "The Dhangar dance is performed only by men" असा उल्लेख करून लेखक आदिवासी आणि धनगर यांच्यातील फरक स्पष्ट करत आहे. आदिवासींच्या सर्वच नृत्यांत पुरुष व महिला एकत्रितपणे नृत्य करतात. आदिवासींमध्ये महिलांना मानाचे स्थान दिले जाते. तारपा नृत्य, कांबड नाच, डांगी नृत्य इत्यादीत आदिवासी महिला व पुरुष एकत्रितपणे नृत्य करतात. याउलट धनगरांच्या नृत्यात फक्त परुष नृत्य करतात. हे आदिवासींच्या मातृसत्ताक संस्कृतीपासून फारच भिन्न आहे.

१२) The Castes and Tribes of H.E.H. The NIzam's Dominions, Vol-I या Syed Siraj Ul Hassan (One of the judge of H.E.H. Nizam's High Court) यांच्या सन १९२० साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात "Dhangar – the shepherd and blanket weaver caste of the Marathwada….. The name 'Dhangar' is derived by some from the Sanskrit word 'Dhenugar' meaning 'cow keeper'…. In physical character and customs they resemble the Maratha Kunbis, which suggests that they are formed from them" असा उल्लेख करून धनगर या शब्दाची उत्पत्ती व त्यांचे मराठा कुणबी या जात समूहाशी असलेले साम्य दर्शविण्यात आलेले

आहे. सदर पुस्तकाचे लेखक हे उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केलेले असल्याने त्यांनी मांडलेले मत अधिक महत्त्वपूर्ण आहे.

१३) The Castes and Tribes of H.E.H. The NIzam's Dominions, Vol-I या Syed Siraj Ul Hassan (One of the judge of H.E.H. Nizam's High Court) यांच्या सन १९२० साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात वैदू (Vaidu) जातीच्या अंतर्गत रचनेबाबत (Internal structure) वर्णन करताना लेखकाने चार वर्गांचा उल्लेख खालीलप्रमाणे केलेला आहे,

"Vaidu's have the following four sub-divisions – Jinga Bhoi, Koli, Dhangar and Mali, which have reference to the castes from which they were originally recruited"

१४) Urban Politics In India या Rodney W. Jones लिखित व University of California Press ने सन १९७४ मध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकात पान क्रमांक २५ वर धनगर हि मराठी भाषा बोलणारी जात म्हणून उल्लेख केलेला आहे.

"Dhangars are a Marathi speaking shepherd caste, comparable in status to the Ahirs (Cattle breeders) of North India"

१५) Report on the Administration of Holkar State for 1936 या पुस्तकात 'धनगर मराठा' असा उल्लेख करण्या आलेला आहे.

१६) Hindu Tribes and Castes या M. A. Sherring लिखित सन १८७९ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात आलेला मजकूर धनगर व कुणबी यांच्या साम्याविषयी प्रकाश टाकतो.

"Dhangar – The shepherd and goatherd caste. It's members are said to resemble the kunbis. There are several divisions of this caste"

१७) Report of the Land Revenue Settlement of Hazara District of the Punjab या Captain E.G.Wace यांच्या १८७४ साली लाहोर येथून प्रकाशित झालेल्या पुस्तकात पान क्रमांक १९७ वर 'धनगर' नावाच्या मातीच्या प्रकाराचा उल्लेख केलेला आहे. धनगर समाज ज्या Dhangad आणि Dhangar या शब्दांतील नामसाधर्म्याचा उल्लेख करतात, ते पाहता या पुस्तकातील धनगर या मातीच्या प्रकारचा संदर्भ महाराष्ट्रातील धनगरांशी खरच जुळवता येईल का यावर विचार होणे आवश्यक आहे.

"The nest quality of soil is known variously as Sikar, Retar, Rakkar, Dhangar, Jhamra, Garera, Gar, Danna, Thangar, Harrand……. Dhangar and Jhamra are hard clay soils full of stones"

वरील मजकुरातील धनगर आणि महाराष्ट्रातील धनगर यांच्या स्पेलिंगमध्ये कोणताही फरक नाही. याचा अर्थ ते समान होत नाहीत. तसेच Dhangad आणि Dhangar या स्पेलिंगमध्ये कोणतेही साम्य नसताना ते ओढूनताढून जोडण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे.

१८) Gazetteer of Bombay Presidency : Ahmednagar, Vol-I (1884) पुस्तकात पान क्रमांक ३७ वर धनगरांचा व्यावसायिक पशुपालक म्हणून उल्लेख करण्यात आलेला आहे.

"The only professional shepherds are Dhangars….."

१९) Statistical Abstract of H.E.H. the Nizam's Dominions from 1331 to 1340 Fasli, लेखक : Mazhar Husain, प्रकाशक : Government Central Press, प्रकाशन वर्ष : १९३८ या पुस्तकात पान क्रमांक १५२, १६६, १८४, २६६ मध्ये व Census of India 1931, Volume XXIII, लेखक : Gulam Ahmed Khan, प्रकाशन वर्ष : १९३३ या पुस्तकात पान क्रमांक १०६, २४५, २४७ मध्ये Bir, Nander असे अनुक्रमे बीड व नांदेडचे उल्लेख करण्यात आलेले आहेत. यावरून मराठीतील 'ड' हा इंग्रजीत 'र' असा लिहिला जातो असे सिद्ध होते. त्यामुळे मराठीतील 'धनगर' हा शब्द इंग्रजीत 'धनगड' असा लिहिला गेल्याचा दावा फोल ठरतो.

२०) Census of India 1931, Volume XXIII, लेखक : Gulam Ahmed Khan, प्रकाशन वर्ष : १९३३ या पुस्तकात पान क्रमांक १८४ मध्ये Hindu (Brahmanic) जातींच्या स्तंभात ३६ नंबरवर Yadava (Golla, Gowli, Dhangar) असा उल्लेख करण्यात आलेला आहे व त्यांचा व्यवसाय म्हणून Cowherds and Shepherds असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

याच पुस्तकात पान क्रमांक १८४ वर Tribal जमातींची यादी दिलेली असून यात भिल, गोंड इत्यादी आदिवासी जमातींचा उल्लेख केलेला आहे. धनगर हे आदिवासी असते तर Hindu (Brahmanic) या स्तंभात त्यांचा उल्लेख करण्याऐवजी Tribal च्या जमातींच्या यादीत त्यांचा समावेश लेखकाने केला असता. परंतु आदिवासी आणि धनगर यांच्यात कोणतेही साम्य नसल्याने लेखकाने वेगवेगळे उल्लेख केलेले आहेत.

२१) Census of India 1901, Vol-XXII, Hyderabad, Part I Report by Mirza Mehdy Khan या पुस्तकात पान क्रमांक २२२ वर धनगर जातीचा उल्लेख केलेला आहे.

"…..there is at least one caste, Dhangar, which has a smaller percentage"

२२) पुस्तक : म-हाटी संस्कृती काही समस्या
लेखक : शं. बा. जोशी,
प्रकाशक : आंतर भारती प्रकाशन,
प्रकाशन : दि.२४ डिसेंबर १९५२

या पुस्तकात **धनगर जातीचा** उल्लेख केलेला असून **व-हाडात धनगर (मराठे) म्हणण्याची पद्धत रूढ असल्याचे वर्णन** केलेले आहे.

सदर पुस्तकातील वर्णन धनगर शब्दाच्या विविध अंगांचे दर्शन घडविते.

"कर्णाटांतील धनगर (कुरूब), कुणबी वैगेरे जातींतून घराण्यातील एक व्यक्ती – ज्येष्ठ पुत्र किंवा कोणता तरी एक पुत्र – व्रतस्थ ठेवण्याची, देवाला अर्पण करण्याची रूढी आहे"

(पान क्रमांक १५)

"व-हाटची पुष्कळ देशमुख – देशाचे प्रमुख – घराणी 'हटगार' (धनगार) कुळींची असल्याचे कळते. हटगारांना हटगार – धनगर किंवा धनवडे (मराठे) म्हणण्याची प्रथा व-हाडकडे आहे. हे मुळांत गोपालनवृत्तीचे लोक होत. (गो) धन पाळणारे म्हणून यांना 'धनगर' नाव मिळाले. हटगार या शब्दाचा अर्थही कानडीत गोपाल असाच आहे"

(पान क्रमांक २७)

"हट्टीकार म्हणजेच 'धनगर', 'धन'ला येथे गो-धन असा अर्थही आहे. कानडीत 'दन' म्हणजे गुरे ढोरे......(गो) धन पाळणारा तो 'धनगर' अर्थात 'हट्टीकार', तोच 'दनगार'. 'दनगार' (म्हणजे गुरे पाळणारा) हा शब्द आजही कानडी बोलीत रूढ आहे" (पान क्रमांक ४३)

"हट्ट म्हणजे गौळवाडा; हट्टे म्हणजे गवळी, धनगर, धनवडे"

"कर्णाटांतही हट्टीकार जन आहेत. या भागांत हट्टीकार – दन (धन) गार जनाला आणखी एक पर्यायशब्द रूढ आहे; यांना 'हालूमतदवरु' म्हणण्याची प्रथा आहे. हालू म्हणजे दुध. हालूची वृत्ती करणारे म्हणजे धनगर – गवळी असाच याचा अर्थ आहे."

(पान क्रमांक ५५)

वरील विवेचनावरून धनगरांच्या पुर्वपरंपरेची कल्पना येण्यास मदत होते.

२३) **होळकरांची कैफियत : संशोधन व टिपा (दुसरी आवृत्ती १९७२)** या **यशवंत नरसिंह केळकर** यांच्या पुस्तकात धनगर आणि मराठे हे एकच असल्याची नोंद आढळते.

"…….नंतर पेशवे यांनी पवार, धनगर वैगेरे अवघे मराठे मंडळी जमा करून गंगेपुढे चाल केली" (पान क्रमांक २)

"….मग धर्माजी शिंदे वैगेरे मराठे धनगर यांनी सल्ला दिला….."
(पान क्रमांक १७२)

२४) पुस्तक : **आजच्या हिंदू जीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष**
लेखक : भा. रं. कुळकर्णी,
प्रकाशक : राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
प्रकाशन वर्ष : १९३८

"धनगर जातीत फारच लहानपणी लग्न करण्याची चाल आहे." (पान क्रमांक २४५)

"धनगरांच्या प्रमुख तीन जाती :
अ) खुटेकर उर्फ आहेर किंवा अहिर धनगर
आ) झेंडेकर
इ) हाटकर " (पान क्रमांक २६७)

२५) पुस्तक : **अहिराणी भाषा व संस्कृती (अल्प परिचय)**
लेखक : भा. रं. कुळकर्णी
प्रकाशन वर्ष : १९४२

"अहिर, सोनार, शिंपी हे स्वत:ला मराठे रजपुतांपेक्षा काहीसे वर समजतात, तर अहिर धनगर, सुतार, न्हावी, लोहार, गुरव वैगेरे जातींचा मराठे रजपुतांशी अन्न व्यवहार चालतो."

२६) पुस्तक : **साम्राज्यातील आपले संबंधी ब्रिटीश बेटांतील लोक** भाग १ ला

लेखक : ना. म. पटवर्धन

प्रकाशन वर्ष : १९३२

सदर पुस्तकात धनगर समाज हा इतर देशातही म्हणजेच स्कॉटलंडमध्येही अस्तित्वात असून त्यांच्या तेथील व्यवसाय देखील गुरे ढोरे व शेळ्या मेंढ्या चारणे हा असल्याचा उल्लेख पान नंबर ५५ वर करण्यात आलेला आहे.

२७) पुस्तक : **मंडल आयोग सामाजिक परिवर्तनाचे पुढचे पाउल**

लेखक : धरमचंद चोरडिया

प्रकाशक : भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

या पुस्तकात अन्य मागासलेल्या महाराष्ट्रातील जातींच्या यादीत ६९ नंबरवर धनगर असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

२८) पुस्तक : **महात्मा फुले रचनावली**

अनुवाद व संपादन : डॉ. एल.जी.मेश्राम 'विमलकीर्ती'

"जो लोग ...... बकरियो के झुंड पालने लगे, वे धनगर (गडरिया, गडेरिया) हो गए"

"शूद्रो के कुलस्वामी जेजुरी के खंडेराव ने शुद्र (कुनबी) कुल कि म्हालसाई और धनगर कुल कि बानाबाई – इन दो जातियो कि दो औरतो से ब्याह किया था, इसलिए पहले कुनबी और धनगर इन दो जातियो में आपस में बेटी व्यवहार होता था" (पान क्रमांक २८९)

२९) पुस्तक : **देवी श्री अहल्याबाई होळकर**

लेखक : पुरुषोत्तम

प्रकाशन : मार्च १९१३

"मल्हारराव होळकर यांच्या संगतीने पुष्कळसे मराठे धनगर झाले"

(पान क्रमांक ७१)

३०) पुस्तक : **श्रीमंत बाजीराव बल्लाळ**
लेखक : नागेश्वर विनायक बापट
प्रकाशन वर्ष : १९०३

"होळकर या शब्दातील 'होळ' या नावाचा एक गाव पुणे जिल्ह्यात नीरेच्या काठी आहे. त्या गावी मल्हाररावाचा बाप चौगुला होता, व तो तेथील राहणारा म्हणून त्यास 'होळकर' म्हणत. तो जातीचा धनगर. त्याला इ.स.१६९३ त मुलगा झाला. त्याचे नाव मल्हारी असे ठेविले"

३१) पुस्तक : **परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांचे चरित्र**
लेखक : वामन परशराम मेहेंदळे
प्रकाशन वर्ष : १९१७

"...... आटपाडी व गुणदाळ ह्या तालुक्यांत धनगर, कोळी, कुणबी, चांभार, ढोर वैगेरे जातीच्या लोकांची वस्ती फार असून ते विद्याहीन आहेत"
(पान क्रमांक ६)

३२) पुस्तक : **जातिभास्कर**
लेखक : खेमराज श्रीकृषदास
प्रकाशन वर्ष : १८४८

"यह जाती .... गडरिया कहलाती है युक्तप्रदेश में यह भेड बकरी चराते है, उनके कम्बल आदी बनाते है यह...... बम्बई में अहिर, नागपूरमें गौली, राजपुतानेमें गुजर, मालवेमें धनगर और डंगर कहाते है"
(पान क्रमांक ३७१)

३३) पुस्तक : **महाराणी बायजाबाईसाहेब शिंदे ह्यांचे चरित्र**
लेखक : दत्तात्रय बळवंत पारसनीस

"फकीरजी गाढवे – हे सातारा जिल्ह्यांतील वाई गावचे रहिवासी असून जातीचे धनगर होते"

"उदाजी कुटके – हे जातीचे धनगर असून अहमदनगर जिल्ह्यांतील कोळ पिपळगावचे राहणारे होते"
(पान क्रमांक ६५)

३४) पुस्तक : **श्रीमाणिकप्रभू चरित्र**
लेखक : गणेश रघुनाथ कुलकर्णी
प्रकाशक : अप्पासाहेब देशपांडे
प्रकाशन वर्ष : १९३७

मैलार या अति प्राचीन क्षेत्राचे मल्हारी महात्म्यातील वर्णन करताना पुढील उल्लेख आलेला आहे,

"मणिचूल पर्वतावरील हे क्षेत्र त्या काळी अत्यंत भरभराटीत होते. देवाचे पुजारी धनगर जातीचे होते."
(पान क्रमांक १५१)

३५) पुस्तक : **Shepherds of India**
लेखक : Shashi S.S.
प्रकाशन वर्ष : १९७८

"The word Dhangar is derived from cattle wealth. Gar is indicative of cattle-grazers or shepherds." (Page No 15)

"It is essential to mention here some theories. The Dhangar historians believe Dhaval village…….. This proves that Dhangars are a part of Maratha society." (Page No.16)

"Name of the Caste or sub-caste in Maharashtra – Dhangar, Khuntekar, Hatkar, Hatgar, Banjara, Baghel, Maratha" (Page No.19)

"Like the Marathas of Indore who call themselves Dhangar Ahir, the Ahirs of Maharashtra prefer to be known as Ahir Dhangars." (Page No. 46)

३६)   पुस्तक : **मराठी विश्वकोश, खंड १२**
लेखक : दौलतराव भोसले
संपादक : लक्ष्मणशास्त्री जोशी
प्रकाशन वर्ष : १९८५

"महाराष्ट्रातील भटक्यांच्या व्यवसायामध्ये पशुपालन करणारे यामध्ये गुरे आणि शेळ्या मेंढ्यापासून मिळणारी लोकर, कातडी, हाडे, दुध तसेच गुरांची विक्री, त्यांची देवाणघेवाण यावर उदरनिर्वाह करतात. कळपातील पशूंच्या गरजांशी त्यांचे भटकेपण निगडीत असते. त्यांना चरण्यासाठी आवश्यक कुरणाच्या शोधात ते फिरतात."   (पान क्र. १९ & २०)

३७)   पुस्तक - **Mendhe Dhangars in Hatkangale Taluka : A Sociological Study**
लेखक : धनगर एस.एम.
प्रकाशन वर्ष : १९८३

"....... ज्या लोकांकडे मोठ्या प्रमाणावर मेंढ्या आणि गाई यांची मालकी असे त्याला धनगर किंवा श्रीमंत माणूस म्हणून ओळखले जाई." (पान क्र.१६)

३८)   पुस्तक : **महाराष्ट्रातील भटका समाज**
लेखक : ना. धो. कदम
प्रकाशन वर्ष : १९९३

"धनगर म्हणजे 'धनाचे आगर' असाही अर्थ प्रचलित आहे." (पान क्र. ११२)

३९)   पुस्तक : **सातारा येथील वैदू जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास**
लेखक : एस.एम.चव्हाण
प्रकाशन वर्ष : १९९३

"ज्यावेळी पृथ्वीवर फक्त पाणीच होते, जमीन नव्हती, तेव्हा आदिपुरुष जामऋषी होता. त्याने पाण्यावर राहण्यासाठी लव्हाळ्याचा पाळणा केला. यावेळी सामर्थ्याने जाम ऋषीला तीन मुले झाली त्यांची नावे

रक्तमुनी, यपमुनी, दुधमुनी. यातील दुधमुनीला कापले तेव्हा पाण्याचे दुध झाले. रक्तमुनीला कापले तेव्हा रक्त झाले व यपमुनीला कापले तेव्हा जमीन निर्माण झाली. यावेळी अंजना देवीच्या अंगावर ईभिष्ण या देवाच्या लघवीचे सात थेंब पडले व देवीस सात मुळे झाली. या सात मुलांचा ताडाच्या पानापासून पाळणा तयार करून जाम ऋषीने सांभाळ केला व हि मुळे मोठी केली. हि सात मुळे म्हणजे वैदू, कोल्हाटी, वडार, कैकाडी, धनगर, ब्राम्हण व महार हि होत.”

(पान क्रमांक २७)

४०) पुस्तक : **धनगर समाजाचा प्राचीन इतिहास व गोत्र**
लेखक : गणपतराव कोळेकर
प्रकाशन वर्ष : १९९२

गणपतराव कोळेकर यांनी धनगर समाजाचा वेदकाळापासून इतिहासाच्या माहितीचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते,

“काही अभ्यासक म्हणतात कि धनगर समाज हा द्रविड वंशातील आहे. परंतु द्रविड वंशातले पोटभेद तामिळ, तेलगु, कन्नड, मल्याळी, तुळू असे आहेत. त्यात धनगर समाज नाही. धनगर समाजामध्ये अहिर, अस्सल किंवा मराठा, बनगी, बरगेबंद किंवा मेटकरी, डंगे, गडगे, गवळी, हटकर किंवा झेंडे, होळकर, कंगर, क्षित्री, खिलारी किंवा भिलारी, खुटे किंवा खुटेकर, कुकटेकर, लाड, मेंढे, म्हसकर, सणगर, शेगर, शिरोट्या व उटेकर असे पोटभेद आहेत. त्यामध्ये आदिवासी, वन्य जमाती किंवा द्रविड वंशाचे नाव नाही.”

“आर्य लोक उत्तर धृवाकडून दक्षिणेकडे येताना आल्प्स पर्वत व अलताई प्रदेशात बरेच दिवस राहिले. तेथे असलेले वन्य प्राणी, मेंढ्या मानवाला आपले मांस व दुध रूपाने अन्न पुरवणारे असे बहुउपयोगी प्राणी म्हणून त्यांना माणसाळून आणले व पाळले. आर्य लोकांचे वंशजच धनगर हे लोक आहेत.”

(पान क्रमांक ५ & ६)

४१) पुस्तक : **भारत के यायावर**
लेखक : शशी एस. एम.
प्रकाशन वर्ष : १९८४

"........मध्य भारतातील (महाराष्ट्र) धनगर समाजाची सामाजिक संरचना हि आर्य संस्कृतीप्रमाणे आहे." (पान क्रमांक २७, २८)

४२) पुस्तक : **नाथांचा भागवतधर्म**
लेखक : प्रा.श्रीधर रंगनाथ कुळकर्णी
प्रकाशक : बळवंत गिरीराव घाटे, श्री एकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद
प्रकाशन : १० मार्च १९५८

"एकनाथांच्या भारुडाप्रमाणे रूपकगरम भाषेत **अध्यात्मज्ञान** सांगणारा प्रसिद्ध कवी **कनकदास** हा याच काळात म्हणजे **शके १४४२** च्या सुमारास होऊन गेला...........कनकदास हा **जातीचा धनगर**...." (पान क्रमांक १४७)

४३) पुस्तक : **लेखनकला आणि लेखन-व्यवसाय**
लेखक : वासुदेव गोविंद आपटे
प्रकाशन : १९२६

"ग्राम्यगीते (Pastoral) गीतांमध्ये खेडेगावांतल्या म्हणजेच धनगर, गुराखी, शेतकरी, मेंढपाळ इ. गावंढळ लोकांच्या तोंडी असलेली किंवा त्यांच्या आयुष्यक्रमाचे वर्णन करणारी गीते येतात." (पान क्रमांक ७५)

वरील मजकुरात ग्रामीण गीतांचे पोटभेद मांडत असताना लेखकाने धनगर गीतांचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये त्यांनी आदिवासी गीते असा उल्लेख केलेला नाही. गावातील शेतकरी, गुराखी, मेंढपाळ इत्यादी वर्गपेक्षा आदिवासींचे जगणे भिन्न असल्याने त्यांचा उल्लेख धनगरांच्या ग्राम्यगीतांबरोबर लेखक करत नाही.

४४) पुस्तक : **संकेत कोश**
लेखक : श्री.शा.हणमंते
प्रकाशिका : सौ.कमलाबाई बेंद्रे, सोलापूर
प्रकाशन : ६ सप्टेंबर १९५८

"अठरा पगड जात – १)तांबट, २)पाथरवट, ३)लोहार, ४)सुतार, ५)सोनार, ६)कासार, ७)कुंभार, ८)गुरव, ९)धनगर, १०)गवळी, ११)वाणी, १२)जैन, १३)कोळी, १४)साळी, १५)चितारी, १६)माळी, १७)तेली व १८)रंगारी" (पान क्रमांक २०७)

वरील नोंदीत दर्शवलेल्या अठरा पगड जाती म्हणजेच त्या काळात सेवा देणारे वर्ग होय. **महात्मा फुलेंनी** त्यांच्या **'शेतकऱ्यांचा आसूड'** ग्रंथात मांडल्याप्रमाणे "**अठरा** वर्णातील **अठरा** प्रकारच्या पगड्या घालणाऱ्या जातींना **अठरा पगड** जाती म्हटले. या **अठरा पगड जातींच्या यादीत धनगरांचा समावेश करण्यात आलेला असून यात एकाही आदिवासी जमातीचे नाव दिसून येत नाही**. कारण आदिवासी कधीही या जात वर्गाचे घटक नव्हते. यातून आदिवासी आणि धनगर यातील फरक आपण सहज समजून घेऊन शकतो.

४५) पुस्तक : **महाराष्ट्रधर्म अर्थात मराठ्यांच्या इतिहासाचे आत्मिक स्वरूप**
लेखक : भास्कर वामन भट, वकील, धुळे
प्रकाशन : विजयादशमी, १८४७

"कलमांतील साहा खुमाखेरीज महाराष्ट्रधर्म आहे याचा अर्थ त्या लेखांत दर्शविलेल्या साहा खुमाखेरीज वैदिक, पुराणोक्त किंवा इतर हिंदुधर्मी म्हणजे भंडारी, कोळी, आग्री, कुणबी, परीट, न्हावी, बुरुड, साळी, मराठे, मोकाशी, लोहार, जिनगर, कुंभार, धनगर, चांभार, वैगेरे प्रचलित हिंदूधर्माप्रमाणे आचरण करणाऱ्या जाती असा आहे."
(पान क्रमांक ५०७)

वरील मजकुरात हिंदू धर्मातील जातींचा प्रामुख्याने उल्लेख करताना धनगर या जातीचा उल्लेख केलेला असून यात आदिवासींच्या कोणत्याही जमातीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. आदिवासी हे हिंदू नाहीत. त्यामुळेच लेखकाने यात महाराष्ट्र धर्म मांडत असताना महारष्ट्रातील एकाही आदिवासी जमातीचा उल्लेख केलेला नाही. लेखक हे स्वतः वकील असल्याने त्यांना कायदेशीर बाबी अधिक स्पष्ट समजत असल्याने त्यांनी धनगरांचा जातीत समावेश केलेला आहे.

४६) पुस्तक : **श्री गुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा**
लेखक : रामचंद्र चिंतामण ढेरे
प्रकाशक : अ. ल. गाडगीळ, वोरा आणि कंपनी, मुंबई
प्रकाशन : 1959

"गंगानाथ ही नाथपंथी साधू पुण्याचे.........गंगानाथांचा जन्म शके 1671 च्या सुमारास क्षत्रिय धनगर समाजात झाला..........घरचा जाति विशिष्ट व्यवसाय मेंढपाळीचा होता."

(पान क्रमांक 182)

वरील मजकुरातील नाथपंथ हा शब्द प्रयोग हिंदू धर्माचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग असून क्षत्रिय धनगर हा शब्द प्रयोग धनगर ही जात हिंदू धर्माचेच एक महत्त्वपूर्ण अंग असल्याचे स्पष्ट होते. तसेच धनगर जातीचा व्यवसाय हा मेंढपाळीचा असल्याने त्यांचा आदिवासींच्या कोणत्याही जमाती सोबत साम्य असल्याचे दिसून येत नाही.

४७) पुस्तक : **व्यायामज्ञानकोश खंड १० वा विदेशी शर्यती**

संपादक व प्रकाशक : दत्तात्रय चिंतामण करंदीकर मुजुमदार, बी.ए.एल.एल.बी., बडोदे

प्रकाशन : १९४९

"आण्णाप्पा खंडू वाघमोरे, राहणार मोळे, ता. मिरज, वय वर्षे २५, याने पाण्याने भरलेली घागर दातांनी उचलून दाखविली...........हा जातीने धनगर असून मिरजेस स्वार म्हणून नोकरी करीत होता." (पान क्रमांक १००)

वरील मजकुरात धनगर जातीचा उल्लेख केलेला असून सदर पुस्तक अनुसूचित जाति व अनुसूचित जमाती १९५०ची सूची जाहीर करण्यापूर्वी प्रकाशित झालेले आहे. सदर लेखक बी.ए.एल.एल.बी.चे शिक्षण घेतलेले असल्याने कायद्याची चांगलीच जाणीव असल्याने सदर नोंद महत्त्वपूर्ण ठरते.

४८) पुस्तक : **संसार घरातली कामे**

लेखक : त्र्यंबक नारायण लेले व वासुदेव गोविंद आपटे

प्रकाशन : सप्टेंबर १९१४

"गावठी कांबळे - हे धनगर करतात." (पान क्रमांक १०१)

सदर पुस्तक सप्टेंबर १९१४ म्हणजे स्वातंत्र्याच्या अनेक वर्षे अगोदर प्रकाशित झालेले असून, त्या काळात आरक्षण हा मुद्दा कुठेही विचाराधीन नव्हता. त्या काळात केल्या गेलेल्या नोंदी ह्या वास्तव आहेत. या ठिकाणी धनगरांच्या पारंपरिक व्यवसायाचा उल्लेख केलेला आहे. आदिवासी अशा आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या व्यवसायात त्याकाळात दिसून येत नाहीत. त्या काळात गावठी कांबळे विकून ३ रुपयांपर्यंत किंमत मिळत होती. यावरून आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या व्यवसायात धनगर जातीची लोकं मोठ्या प्रमाणात होती.

४९) पुस्तक : **व्यवहारपद्धति**

लेखक : कृष्णाजी भिकाजी पळनीटकर

प्रकाशक : समर्थ विद्यालय

प्रकाशन : १९०९

"नानासाहेब , भाऊसाहेब व थोरले माधवरावसाहेब आदिकरून थोरल्या बाजीरावानंतरचे पेशवे, मल्हारराव होळकर धनगर असतानाही, त्यांस काका म्हणत व वडिलांप्रमाणे मान देत, हे तर सर्व विश्रुतच आहे." (पान क्रमांक १७८)

चिमाजी अप्पा आणि नानासाहेब पेशव्यांपासून पुढचे पेशवे हे सनातनी असून ब्राम्हणी धर्माचे पुरस्कर्ते होते (संदर्भ : महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य, बा. रं. सुंठणकर, १९४८, पान क्रमांक १२९). असे असतानाही वरील मजकुरात पेशवे हे जातीने धनगर असलेल्या मल्हारारव होळकर यांना काका म्हणत व वडिलांप्रमाणे मान देत असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यावरून धनगर ही जात त्या काळात अस्पृश्य समजली जात नव्हती. ब्राम्हनांच्या समकक्ष ही श्रीमंत व पुढारलेली जात असल्यामुळेच पेशव्यांकडून इतका मान धनगर जातीतील व्यक्तीला दिला जात होता. असा मान पेशव्यांनी आदिवासी जमातीतील कोणत्याही व्यक्तीला दिलेला नाही.

५०) पुस्तक **: महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य**

लेखक : बा. रं. सुंठणकर

प्रकाशन : डिसेंबर १९४८

"पहिल्या बाजीरावाच्या वेळेपर्यंत धनगर कुणब्यापासून साऱ्या जातीचे सेनापति उदयाला येऊन उच्च पदवीला पोहचले होते." (पान क्रमांक १२९)

वरील मजकुरात धनगर जात असा उल्लेख असून धनगर जातीचे अनेक सेनापति असल्याचे उल्लेख आहेत. म्हणजेच सामाजिक पातळीवर नेतृत्त्व करण्याची संधी धनगरांना मिळालेली होती. सदर वैभव आज का लयास गेले याचा शोध घेण्या ऐवजी धनगर आदिवासींच्या मौलिक मूल्यांवर अतिक्रमण करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करत आहेत.

५१) पुस्तक : **राजकीय संस्था**

लेखक : नारायण लक्ष्मण फडके, बी.ए.

प्रकाशक : बळवंत गणेश दाभोळकर, पुणे

प्रकाशन : १९०७

"धनगरी स्थितीत गुरे चारण्याला जे चांगले प्रदेश असतील ते सगळे धनगर मिळून शस्त्रांच्या जोरावर संभाळून धरीत असतात." (पान क्रमांक २२४)

वरील मजकुरात धनगरांच्या व्यवसायाचा उल्लेख आलेला असून चांगल्या प्रदेशाला ते सांभाळून धरीत असत असे म्हटले आहे. आदिवासींच्या बाबतीत सांगायचे झाले, तर आदिवासी जमातींनी कधीही कोणत्याही जमिनीवर आपली मालकी दाखवली नाही. इंग्रजांच्या प्रयत्नातून आदिवासींच्या नावे जमिनी करण्यास सुरुवात झाली. आजही अनेक आदिवासी कुटुंबाच्या नावे जमिनी दिसून येत नाहीत.

५२) पुस्तक : **महाराष्ट्रीय ज्ञानकोश (विभाग आठरावा)**

लेखक : श्रीधर व्यंकटेश केतकर, एम.ए., पी.एच.डी.

प्रकाशक : महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लिमिटेड , नागपूर

प्रकाशन : १९२६

"इंदूर संस्थानचा संस्थापक मल्हारराव होळकर हा जातीने धनगर असून, नीरेकाठच्या होळ खेड्याचा (पुणे जिल्हा) रहाणारा होता."

वरील पुस्तकाचे लेखक श्रीधर व्यंकटेश केतकर हे उच्च शिक्षित होते व त्यांनी पी.एच.डी. ही संशोधक पदवी मिळविलेली असल्याने त्यांनी मांडलेली मते चिकित्सक वृत्तीतून मांडलेली असणार यात काही शंका नाही. त्यांनी आपल्या पुस्तकातील मजकुरात धनगर या जातीचा स्पष्टपणे उल्लेख सन १९२६ मध्येच केलेला आहे. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात 'र' चा 'ड' झाला असा दावा करणे व स्वताला अनुसूचित जमातीच्या यादीत सहभागी करण्यासाठी राजकीय दबाव टाकणे निव्वळ हास्यास्पद आहे.

५३) अंक : **नवभारत (अंक १०)**

प्रकाशन : जुलै १९६९

भारतीय ग्रामदैवते या लेखात श्री. भा.ग.सुर्वे यांनी पुढील उल्लेख केलेला आहे,

"ग्रामदैवतांच्या यात्रा व उत्सवांत कुंभार, लोहार, गवळी, धनगर, धोबी, सुतार, कोष्टी, महारादी जातीच्या लोकांना विशेष मान असतो." (पान क्रमांक ५९)

वरील मजकुरात जातींचा उल्लेख करतांना लेखकाने धनगर या जातीचा उल्लेख केलेला आहे. यात एकाही आदिवासी जमातीचा उल्लेख केलेला दिसून येत नाही.

५४) पुस्तक : **मराठी भाषेचा सरस्वतीकोश**

लेखक : विद्याधर वामन भिडे

प्रकाशक : शंकर नरहर जोशी

प्रकाशन : १९३०

"मेंढया व शेळ्या यांच्यावर निर्वाह मुख्यत्वेकरून करणारे महाराष्ट्रात धनगर लोक होत." (पान क्र. ६४५)

धनगरांच्या व्यवसायाच्या उल्लेखावरून ते पशुपालक आहेत हे स्पष्ट होते. शेळ्या मेंढया चारण्यासाठी त्यांना सततची भटकंती करावी लागत असल्याने ते भटक्या विमुक्त गटात येतात.

५५) पुस्तक : **पानिपतची बखर**

संपादक : डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी (एम. ए. पी. एच. डी .)

"मल्हारजी होळकर (इ. स. १६९३ - १७६६) हा जातीने धनगर होता." (पान क्र . ५७)

मल्हारराव होळकर यांच्या गौरवशाली इतिहासाची माहिती मांडत असताना अनेक संशोधक ते धनगर जातीचे होते असाच उल्लेख करतात. त्यांच्या ऐतिहासिक कार्यात कुठेही आदिवासी असल्याची नोंद आढळून येत नाही.

५६) पुस्तक **: मराठ्यांच्या आपसांतील लढाया**

लेखक : गोविंद गणेश भागवत, धावडशीकर

प्रकाशन : फेब्रुवारी १९४०

सदर पुस्तकात अहिल्याबाई होळकर यांनी महादजी शिंदे यांना तीस लाख रुपये कर्ज दिल्याची नोंद आहे. (पान क्र . २६) यावरून त्या काळातील धनगर समाजाच्या श्रीमंतीची आपणास कल्पना येईल. आजही धनगर समाज

बांधव जरी आपल्या व्यवसायानिमित्त भटकंती करत असला, तरी आदिवासींच्या नशिबात असलेले कुपोषण, गरीबी, फसवणूक, आरोग्य व शिक्षण व्यवस्थेची अनास्था, वाहतूक, रस्ते, रोजगार, अन्याय, अत्याचार, विस्थापन इत्यादी बाबतीत धनगर समाजात वेगळेपण दिसून येते.

५७) पुस्तक : **ग्रंथमाला - मातृपितृसंबंध**

लेखक : जगन्नाथ रावजी तुलू

संपादक : विष्णु गोविंद विजापूरकर

प्रकाशन : १९०६

इंदूर संस्थानविषयी प्रचलित असलेली गोष्ट पुस्तकात मांडण्यात आलेली आहे. ती गोष्ट अगदी लहान असली, तरी होळकर घराण्याकडे पाहण्याचा सर्वसामान्य लोकांचा दृष्टिकोण स्पष्ट करणारी आहे.

एकदा महाराज तुकोजीराव होळकर महाराष्ट्रात आले असता त्यांच्याकडे एक विद्यार्थी आश्रय मागण्या करता आला. तेव्हा महाराज त्याचे मन पाहण्याकरता त्यास म्हणाले, "आम्ही तर बोवा धनगर, आम्हाला त्या तुमच्या विदयेत काय समजते?" त्यावर त्या विद्यार्थ्याने धूर्तपणाने उत्तर दिले की, "महाराज, आपण धनाचे घर आहा!"

'धनगर म्हणजे धनाचे आगर' असे गावगाड्यात म्हटले जायचे त्याचा प्रत्यय येथे येतो. एकंदरीत त्या काळातील धनगर समाज हा श्रीमंत होता.

५८) पुस्तक : **महाराष्ट्र शब्दकोश**

प्रकाशन : १९३६

"भरवाड - एक धनगर जात."

विविध शब्दकोशातही धनगर ही जात असल्याचे अनेक ठिकाणी प्रकाशित करण्यात आलेले आहे.

५९) पुस्तक : **Bulletin of The Government Oriental Manuscript Library Madras**

संपादक : T. Chandrasekharan

प्रकाशन : १९५६

पुणे पेठेची कैफियत मांडताना श्री के. थुलजाराम क्षीरसागर यांनी पान क्रमांक १०५ वर पुढील मजकूर लिहिलेला आहे,

".. ते समई मलहारजी जातीचा मराठा धनगर त्यास उपनाव होळकार याणे रावसाहेबाचे दिवसांत श्री शाहू छत्रपती याज पासी सिले दारीस राहून.."

वरील मजकुरात मल्हारराव होळकर यांच्या जातीचा उल्लेख करताना मराठा धनगर असा शब्द प्रयोग करण्यात आलेला आहे. यावरून आपणास धनगर ही जात मराठा समाजाच्या जवळ जाणारी दिसते.

६०) पुस्तक **: गांव - गाडा**

लेखक : त्र्यंबक नारायण आत्रे (बी.ए.एल.एल.बी.)

प्रकाशन : १९१५

"गावात डोके हलविणाऱ्या **कुणब्याला** - मग तो माली, **धनगर,** मुसलमान, कोणत्याही जातीचा असो - लोक बहुमानाने पाटील म्हणतात."   (पान क्र.३०)

वरील पुस्तकाचे लेखक ***धनगर जातीचा उल्लेख कुणबीची एक पोटजात म्हणून करत आहेत***. सदर पुस्तकाचे लेखक हे उच्च शिक्षित असून कायद्याचे शिक्षण झालेले असल्याने त्यांनी नोंदविलेल्या निरीक्षणांना एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते.

६१) त्रैमासिक : संशोधक

संपादक : डॉ. प्र. न. देशपांडे, डॉ.मु. व. शहा, श्री. अतुल जोशी

प्रकाशन : १९८६

"....धनगर जमात उन्हाळ्यात व हिवाळ्यात मेंढयांचे मोठ मोठाले कळप घेऊन गावाबाहेर पडतात व चाऱ्याच्या शोधात ५० एक मैलापर्यन्त दूर फिरतात, व जेथे मुबलक प्रमाणात चारा उपलब्ध असेल अशा ठिकाणी दोन ते तीन महिने वास्तव्य करतात."   (पान क्र. १४)

वरील मजकुरात धनगर जमातीच्या पशुपालक व्यवसायाचे वास्तव मांडलेले असून त्यावरून त्यांना सतत भटकंती करावी लागत असल्याचे वैशिष्ट्ये येथे नोंदवलेले आहे. यावरून धनगर भटक्या जमातीत येतात हे सिद्ध होते. यातील मजकूर आदिवासी जीवनशैलीशी कोणत्याही प्रकारे जुळत नाही.

६२) पुस्तक : लेवा पाटीदारांचा इतिहास

लेखक : शंकर विठोबा पाटील

प्रकाशन : १९९९

सदर पुस्तकात मराठा व कुणबी हे एकच होय हे दर्शविण्यासाठी मुंबई गॅझेट, सातारा, व्हॉल्युम १९ पान ७५ व मुंबई गॅझेटियर , बेळगाव, व्हॉल्युम २१ पान १२६ चा संदर्भ देण्यात आलेला आहे. त्यातच धनगर जातीचा करताना पुढील मजकूर देण्यात आलेला आहे,

"पुढे मराठे व कुणबी एकमेकाला श्रेष्ठ समजू लागले. मराठ्यांनी स्वत :मध्ये पुढील पोटभेद निर्माण केलेत. १.सूर्यवंशी, २.सोमवंशी किंवा चंद्रवंशी, ३.नागवंशी, ४.ब्रम्हवंशी, ५.अग्नीवंशी व नंतर ६. घाटमाथ्याचे मराठा, ७.धनगर मराठा, ८.शहान्नव कुळी वैगेरे पोटभेट निर्माण केले."

(पान नं. ५९)

वरील मजकुरात धनगर मराठा असा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. यावरून धनगर ही कुणबी व मराठा जातींशी मिळतीजुळती जात असल्याचे सिद्ध होते.

वरील लिखित साहित्यातील संदर्भ पडताळून पाहत असताना स्वातंत्र्यपूर्वीचे संदर्भ अधिक महत्त्वपूर्ण आहेत. कारण त्याकाळात आदिवासी किंवा इतर कोणतेही आरक्षण हा मुद्दा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे धनगर समाजाच्या चालीरीती, प्रथा, परंपरा, राहणीमान, व्यवसाय, जीवनशैली, इतिहास, इत्यादी बाबतचे विवरण निसंकोचपणे व तितक्याच प्रामाणिकपणे मांडलेले आहेत. यातील बहुतांशी लेखक हे बिगरआदिवासी असून त्यांनी पुरेशा अभ्यासानंतर सदर मते लिखित स्वरूपात पुस्तकांतून मांडलेली आहेत. त्यामुळे त्यांनी मांडलेल्या मतांना कोणाचा विरोध किंवा समर्थन असण्याचे कारण नाही. कारण विरोधाने किंवा जाणीवपूर्वक दिलेल्या समर्थनाने त्यातील वास्तव बदलणार नाही. इतके सगळे पुरावे समोर असताना धनगर समाज बांधव मात्र 'ड' आणि 'र' च्या चुकीचा आव आणून सामाजिक वातावरण दूषित करत आहेत.

धनगर समाज नक्की कोण आहे याबाबत असलेले काही पुरावे व संदर्भ पडताळून पाहिल्यानंतर पुढील महत्त्वपूर्ण निकाल व अहवालांबाबत माहिती असणे व काही तथ्ये समजून घेणे आवश्यक आहे.

१) **उत्तर प्रदेशात अलाहाबाद कोर्टात ऑल इंडिया धनगर समाज महासंघाने** १७ जुलै २००९ रोजी याचिका दाखल केली होती. त्याचा क्रमांक रिट सी.नं.४०६२ / २००९ असा आहे. **न्यायालयाने १४ मार्च २०१४ रोजी निकाल देत धनगर हि 'जात' असल्याचे शिक्कामोर्तब केलेले आहे.** दुसरी याचिका क्रमांक रिट सी.नं.१२४३६/२००७ नुसारही धनगर हि 'जमात' नसून 'जात' असल्याचे सिद्ध झालेले आहे.

२) सन **१९११** च्या **जनगननेतील** तक्ता क्रमांक **६** केवळ जातीचा आहे. त्यामध्ये **क्रमांक ७** वर **धनगर जातीची नोंद** आहे.

३) **महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाने** २४ एप्रिल १९८५ साली एक परिपत्रक काढून महाराष्ट्रातील खऱ्या आणि खोट्या आदिवासिंचे तुलनात्मक विवरण दिले आहे. त्यात धनगर हे आदिवासी आहेत असे कुठेही म्हटलेले नाही.

४) सन **१९११** मध्ये **बॉम्बे प्रेसिडन्सी, सी.पी. & बेरार, मराठवाडा** या तीन प्रांतात **धनगर** समाजाचा **'जात'** म्हणूनच उल्लेख आहे.

५) महाराष्ट्र शासनाने एप्रिल २००६ मध्ये एक संशोधन पथक बिहार, ओरिसा आणि झारखंड राज्यांत पाठवून **Dhangad (धांगड)** आणि **Dhangar (धनगर)** हे एकच आहेत का याचा अभ्यास केला आणि शेवटी निर्णय दिला तो असा,

"महाराष्ट्र राज्यातील Dhangar (धनगर) जातीच्या चालीरीती, रूढी, परंपरा, देवदेवता व पारंपरिक व्यवसाय हा Dhangad (धांगड) जमातीपेक्षा भिन्न असून या दोन्ही जाती -जमाती एकमेकांपासून भिन्न आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीत धनगर जातीचा ओरॅान या जमातीची तत्सम जमात म्हणून समावेश करता येणार नाही."

६) सन **१९३१** ची जनगणना **जे.एच.हट्टन** यांनी केली होती. ते १९२९ ते १९३३ पर्यंत जनगणना आयुक्त होते. त्यांच्या **जनगननेचा खंड ३** मध्ये **पान क्रमांक ६६** वर हट्टन यांनी **भटक्या जातीचा तक्ता** दिलेला आहे. त्यामध्ये **क्रमांक ४** वर **धनगर** जातीचा स्पष्ट उल्लेख आहे. **खंड दोनमध्ये** पान क्रमांक

१६६ वर **जात क्रमांक ३०** वर **'गडरीया'** नावाच्या मुख्य जातीची नोंद आहे. त्याच्या उपजातीची नावे **भाखड, धनगर** आहेत.

७) ओरॉव हि मध्यप्रदेश, ओरिसा आणि पश्चिम बंगाल राज्यातील महत्त्वाची जमात आहे. ओरॉव हे जन्मजात शेतकरी आहेत. त्यांची स्वतःची शेती असून आपल्याच जमिनीत मशागत करण्यात गुंतलेले असतात. ओरावचे प्रादेशिक नाव धांगड असे आहे. त्याचा अर्थ शेतमजूर असा होतो. याच्या उलट धनगर हि पशुपालक जात असल्याच्या अनेक नोंदी आहेत. त्यामुळे **धांगड व धनगर यांच्यात कोणतेही साम्य दिसून येत नाही.**

८) आदिवासींची **कुलचिन्हे** हि निसर्गातील सजीव किंवा निर्जीव वस्तू असतात. ओरॉव (धांगड) यांचा धरम देव हा सूर्य देव आहे. त्याची ते पूजा करतात. सूर्य हा निसर्गाचे एक प्रतिक आहे. या उलट धनगर हे बिरोबा व खंडोबाची पूजा करतात. बिरोबा व खंडोबा हे त्यांचे प्रमुख देव आहेत. बिरोबा व खंडोबा हि मानवी प्रतिके आहेत.

९) श्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना टाटा संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडे धनगर हे आदिवासी आहेत की नाहीत यावर संशोधन करण्याचे काम दिले होते. टाटाने संशोधन केंद्राने सदर अहवाल शासनाकडे दिलेला आहे. सुदैवाने राज्यात सद्यस्थितित देवेंद्र फडणवीस हे जरी उपमुख्यमंत्री असले तरी खरी सत्ता त्यांचीच आहे. असे असतानाही सदर अहवाल शासन जाहीर करत नाही. याबाबत कोर्टात देखील अनेकदा विचारणा करण्यात आलेली आहे. परंतु सरकार त्यातून वेलकाढूपणा करून जनतेची फसवणूक करत आहेत.

१०) ओरिसातील **ओरॉव (धांगड) मध्ये १८ कुळे** आहेत. महाराष्ट्रातील **धनगरांमध्ये ३२ कुळी** आहेत. दोन्हीमधील कुळांचे व्यवसाय भिन्न असून देवदेवता यात देखील भिन्नता आहे. त्यामुळे धांगड आणि धनगर हे एकच आहेत असे म्हणणे पूर्णपणे चूक आहे.

११) आदिवासींमध्ये **कुलचिन्ह** असते. तर धनगर समाजामध्ये **गोत्र पद्धती** अस्तित्वात आहे. **आदिवासींची कुलचिन्हे हि निसर्गातील प्रतीके असतात**. उदा. हिरवा देव, वरसुबाई, उंबऱ्या देव, इत्यादी. तर धनगर समाज खंडोबा, बिरोबा यांची पूजा करतो. **दोन्हीही धनगर समाजाचे देव हे माणसाचे प्रतीक असून त्यातून निसर्गाचा किंवा निसर्गाच्या प्रतिकांचा कुठलाही बोध होत नाही.**

१२) दिनांक **२४ ऑगस्ट २०१६** रोजी **सांगली** येथील सभेत **अण्णा डांगे** म्हणाले होते की, ***"राज्य सरकारच्या कागदपत्रांनुसार धनगर ही भटकी जमात आहे. त्यामुळे मुंबईतील सामाजिक विज्ञान संशोधन संस्थेतर्फे धनगर समाजावर सुरू असलेले संशोधन त्वरित रद्द करावे."***

अण्णा डांगे यांच्या या व्यक्तव्यातून धनगर हे संशोधनाच्या माध्यमातून कधीच आदिवासी सिद्ध होऊ शकत नाहीत हे वास्तव त्यांना माहीत असल्याचे जाणवते. त्यामुळे ते राजकीय दबाव टाकून आदिवासी आरक्षण मिळवू पाहत आहेत.

१३) **आदिवासींच्या पारंपारिक नृत्यांत महिला व पुरुष एकत्रितपणे नृत्य करतात**. उदा. कांबड नृत्य, तारपा नृत्य, डांगी नृत्य इत्यादी. **धनगर समाजातील धनगर नृत्यात फक्त पुरुष नृत्य करतात**. आदिवासी समाजात **मातृसत्ताक पद्धती** असल्याने महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान संस्कृतीत दिलेले आहे. धनगर समाजात **पितृसत्ताक पद्धत** अस्तित्वात आहे.

१४) भारतीय संविधानाने ***आदिवासी कोणाला म्हणावे व कोणाला म्हणू नये*** याचा स्पष्ट उल्लेख **राज्यघटनेच्या कलम क्र . ३६६(२५)** मध्ये केलेला आहे. त्यानुसार धनगर हे आदिवासी नसल्याचे अनेक अहवालांतून सिद्ध झालेले आहे.

१५) **भारतीय राज्य घटनेतील कलम २४१ (१)** च्या अंतर्गत भारताच्या **राष्ट्रपतीला** विशेष अधिकार देऊन असे स्पष्ट केले आहे की, कोणत्याही राज्यात एखाद्या प्रवर्गाला अथवा त्या प्रवर्गातील काही पोट जातींना **अनुसूचित जमातीच्या सूचित** टाकायचे असेल तर घटनेने घालून दिलेल्या प्रक्रियेचा अवलंब करावा. धनगर समाज अशा कोणत्याही सांविधानिक प्रक्रियेचा वापर करत नसल्याचे दिसून येत आहे.

१६) **मल्हारराव होळकर** मुळचे महाराष्ट्रातील **धनगर जातीतील** होते. त्यांचे इतिहासात खूप मोठे योगदान आहे. त्यांच्या संघर्षाला कोणत्याही इतिहासकाराने **आदिवासी लढा** म्हणून गौरविलेले नाही. मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सुनबाई **पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर** या मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताच्या कारभार बघू लागल्या. लढाईत त्या स्वत : सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. असे असले तरी त्यांच्या या कर्तृत्वाला **आदिवासी महिलेचे योगदान** म्हणून कोणत्याही इतिहासकाराने नोंदवले नाही. उलट अहिल्याबाई होळकर यांनी भारतभरात अनेक **हिंदू मंदिरे** व **नदीघाट** बांधले. तसेच **अनेक प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जिर्णोद्धार केला**. यावर त्या हिंदू धर्मीय असल्याचे सिद्ध होते. ***धनगर ही आदिवासी जमात नसून ती एक हिंदू धर्मातील जात असल्याचे सिद्ध होते.***

१७) **'धनगर'** हा शब्द संस्कृतमधील 'धेनुगार' या शब्दापासून आलेला असल्याचे अनेक संदर्भ उपलब्ध आहेत. **धेनुगार म्हणजे गाई गुरे पाळणारा होय**. तसेच या शब्दाचा अजून एक अर्थ होतो, ***धनवान, धन दांडगा व भरपूर धनदौलत असलेला होय***. धनगरांची पोटजात असलेल्या **'हटकरांना'** ही वैशिष्ट्ये तंतोतंत लागू पडतात. ***हटकर ही जात अतिशय गर्भश्रीमंत असून पूर्वी या जातीचा थाट राजासारखा असायचा.***

१८) **धनगर** ही **जात** शारीरिक वैशिष्ट्ये आणि सामाजिक रितीरिवाजाच्या दृष्टीने **मराठा-कुणबी** समाजाच्या जवळची वाटते. म्हणून इतिहासकारांच्या मते धनगर ही जात **मराठा** जातीचीच उपजात आहे.

धनगर समाजाच्या पोट जातींची जी यादी आहे, त्यामध्ये अहिरच्या नंतर क्रमांक २ वर **असल मराठा** ही पोटजात आहे. म्हणून इतिहास संशोधकांनी ***धनगर हे मराठा कुणबी जातीची उपजात होय*** असे म्हटले आहे.

१९) **यवतमाळ जिल्हा गॅझेट १९०८**, पान नंबर २०१ वर **धनोजे कुणबी** व **धनगर** हे एकच समाज असल्याचे म्हटले आहे.

२०) **जातीविवेक** या ग्रंथात स्पष्टपणे सांगितले आहे की **धनगर** हे शूद्र पिता आणि महिश्या माता ह्यांची संतान आहे. पुढे असेही सांगितले आहे की महिश्या ही क्षत्रिय पुरुष आणि वैशी माता यांचे अपत्य आहे. **क्षत्रिय समाज** आणि **आदिवासी** यांच्यात फरक असल्याने धनगर आणि आदिवासी हे समान आहेत असे म्हणताच येणार नाही.

२१) **मनूस्मृती**च्या तिसऱ्या अध्यायात १६६ व्या श्लोकात **धनगर** जातीच्या व्यवसायाचा उल्लेख आढळतो. मनूस्मृति हिंदू धर्म ग्रंथ आहे आणि यात धनगरांच्या व्यवसायाचा उल्लेख आलेला आहे, यावरून **धनगर हे हिंदू धर्माचाच एक भाग आहेत** हे स्पष्ट होते.

२२) **कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे** यांच्या हस्ते सन **१८५०** मध्ये **क्षत्रिय मराठा धनगर तरुण मंडळाची** स्थापना करण्यात आली. **धार्मिक काम** करण्याच्या उद्देशाने सदर मंडळाची स्थापना करण्यात आलेली होती. (संदर्भ : महाराष्ट्र अथवा मराठी वार्षिक ज्ञानसंग्रह, संपादक श्रीपाद महादेव माटे, १९३३, पान नं. २०४)

मंडळाच्या नावावरून धनगर व मराठा हे एकच असून ते क्षत्रिय असल्याचे स्पष्ट होते. या दोन्ही जाति क्षत्रिय असून आदिवासी या गटात येत नाहीत. उलट इतिहासात डोकावून बघितले तर आपल्या लक्षात येईल की भारतातील आदिवासिंचे सर्वाधिक नुकसान क्षत्रिय लोकांनी केलेले आहे.

धनगर आणि आदिवासी जमाती यांच्यात संस्कृती, परंपरा, राहणीमान, रूढी, सामाजिक मुल्ये, सामाजिक ठेवण, भू-प्रदेश, प्रमाण लघुता, रक्तसंबंध, बोलीभाषा, जीवनपद्धती, अर्थव्यवस्था, धार्मिक आचरण, सामाजिक एकजिनसीपणा, कुलप्रतिकवाद, मूळ पुर्वाजापासून झालेली उत्पत्ती, देवक, वसतीस्थान, कुलाची कार्ये, आप्तसंबंध इत्यादी बाबतीत फरक आहे. त्यामुळे धनगर समाजाने असंविधानिक मागणी करून धनगर व आदिवासी असा वाद निर्माण करून आपल्या दोन्ही समाजापुढे असणाऱ्या मुलभूत आव्हानांकडे डोळेझाक करू नये. धनगर समाजाची आर्थिक परिस्थिती पूर्वी सधन असल्याचे अनेक लिखित पुरावे उपलब्ध आहेत. बदलत्या काळाबरोबर जंगलविषयक कायदे व धोरण बदलल्याने मेंढ्या चरण्यासाठी उपलब्ध असलेले जंगल कमी झाले व त्याचा विपरीत परिणाम धनगर समाजाच्या आर्थिक उन्नतीवर झालेला आहे. यात बदल करायचा असेल तर आदिवासी आरक्षण मिळविणे हेच एकमेव ध्येय आहे असे जर त्यांना वाटत असेल तर त्यांनी आदिवासी समाजाची राजकीय परिस्थिती न तपासता सामाजिक व आर्थिक परिस्थिती तपासणे योग्य राहील. आरक्षण म्हणजे गरिबी हटाव योजना नाही. ती एक सामाजिक प्रतिनिधित्व देणारी संधी आहे याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. आज ***शरद पवार, सुप्रिया सुळे, महादेव जानकर, अण्णासाहेब डांगे, गोपीचंद पडळकर*** अशी अनके मंडळी धनगरांना आदिवासी आरक्षण मिळावे म्हणून आकांडतांडव करताना दिसून येत आहे. परंतु हीच मंडळी धनगरांच्या मुलभूत समस्यांवर बोलताना इतकी आक्रमक झालेली आपण पाहिलेली नाही. धनगर, आदिवासी समाजाच्या समस्या ह्या सामाजिक पातळीवरील आहेत. त्यांना सोडवायचे असेल तर सामाजिक पातळीवर विचार मंथन होणे आवश्यक आहे. आपल्या इतिहासातून योग्य ती प्रेरणा घेऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे.

धनगरांचा एकंदरीत इतिहास बघितला तर ते हिंदू धर्मीय असून क्षत्रिय कुळातील असल्याने त्यांना नेहमीच राजाश्रय मिळालेला आहे. अनेक ठिकाणी त्यांची राजघराणी देखील होती. आदिवासींचीही राजघराणी असली, तरी त्यांनी आपला वास्तव्याचा प्रदेश सोडून बाहेर जाऊन राज्य स्थापन केलेले नाही. आदिवासींना राजश्रय मिळाल्याच्या नोंदी नाहीत. आज राजघराणी ही संकल्पना अस्तित्वात नसली, तरी धनगरांना सरकारी पातळीवरून सर्व प्रकारची मदत करण्याचे प्रयत्न मुख्यमंत्री, विविध खात्याचे मंत्री, आमदार, खासदार हे उघडपणे पाठिंबा दर्शवत असल्याचे दिसून येत आहे. आदिवासींच्या बाबतीत बोलायचे झाले, तर निवडक आदिवासी आमदार, खासदार यांच्या सोबत बोटावर मोजण्याइतके बिगर आदिवासी आमदार बोलत आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी संसदेत धनगर आरक्षणासाठी जी आक्रमकता दाखवली, तितकी आक्रमकता एकाही बिगर आदिवासी

खासदाराने आदिवासींसाठी दाखवलेली नाही. धनगर आंदोलनाला मिडियातून जो पाठिंबा मिळतोय, त्या प्रमाणात आदिवासींना मीडिया कव्हरेज देखील मिळताना दिसून येत नाही. धनगरांना न्याय मिळावा म्हणून भूमिका जाहीर करणारी कोणतीही यंत्रणा आज आदिवासी म्हणजे काय? आदिवासींची मौलिक गुणवैशिष्ट्ये नक्की काय? याबाबत अभ्यास करायला तयार नाहीत. धनगर कसे आदिवासी आहेत हे सिद्ध करण्यासाठी जणूकाही स्पर्धा समाजात लागलेली आपणास दिसत असूनही धनगर हे आदिवासी आहेत हे सिद्ध करणारा अहवाल सरकार प्रसिद्ध करू शकत नाही. याचाच अर्थ अगदी सरळ आणि सोपा आहे, तो म्हणजे धनगर हे आदिवासी नाहीतच. त्यांना खोटे संशोधनात्मक पुरावे उभे करून आदिवासी बनवणे ही अतिशय अवघड गोष्ट आहे यांची जाणीव राज्यकर्त्यांना आहे. परंतु असे असले तरी हुकुमशाही पद्धतीने राज्यकारभार चालविणाऱ्या मंडळींचा अहंकार हा अति असल्याने ते धनगर व आदिवासी असा वाद लावण्यात यशस्वी होत आहेत. आदिवासी आरक्षण व आदिवासींच्या मौलिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी लढावी लागणारी लढाई ही आदिवासींनाच लढावी लागत आहे.

जय बिरसा
जय राघोजी
जय आदिवासी
जय महाराष्ट्र

- Raajoo Thokal
AVM ! Aboriginal Voices Maharashtra